रे.मु.नंबर ६७/२०१४

**आदेश निशाणी क्रमांक ४४ वर**

१. प्रतिवादी क्रमांक १ यांनी प्रस्तुतचा अर्ज हा दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ अन्वये प्रतिदाव्यात दुरूस्ती करण्यासाठी दाखल केला आहे.

२. प्रतिवादी यांचे असे कथन आहे की, दाव्याचे कामकाज चालु असतांना बरेचशे कागदपत्रे व माहिती उपलब्ध झाली त्यानुसार वादी क्रमांक ४ यांनी एकत्र कुटूंबाचा कारभार पाहत असतांना एकत्र कुटूंबाचे उत्पन्नातुन स्वताची पत्नी व मुलगा यांचे नावाने लबाडीने मिळकती विकत घेतल्या आहेत. सदर मिळकती हया एकत्र कुटूंबाच्या मिळकतीच्या उत्पन्नातील असुन प्रतिवादी व इतर वादी यांचाही कायदेशरी वाटा व हिस्सा आहे. त्यामुळे सदर मिळकती हया समाविष्ट करून घेण्यासाठी तसेच मिळकतीतील त्यांचा हिस्सा हा अलग व तुटक होउन कब्जा मिळण्यासाठी प्रतिदाव्यात मागणी करण्यासाठी दुरूस्ती गरजेची आहे. म्हणुन प्रस्तुतचा अर्ज.

३. वादी यांनी निशाणी क्रमांक ५७ वर म्हणणे दाखल करून प्रस्तुतच्या अर्जास हरकत नोंदविली आहे. वादी यांचे असे कथन आहे की, सदर मिळकती हया एकत्र कुटूंबाच्या आहेत असे प्रतिवादीने कैफियत व प्रतिदाव्यामध्ये कथन केलेले नाही. केवळ वादीवर दबाव आणुन वादी क्रमांक ४ ही समजुत करेल या उददेशाने प्रतिवादीने खोटा अर्ज दाखल केला आहे. म्हणुन प्रस्तुतचा अर्ज हा खारीज करण्याची मागणी केली आहे.

४. वादी व प्रतिवादी यांच्या विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला. उपलब्ध कागदपत्रांचे अवलोकन केले. वादी यांनी प्रस्तुतचा दावा हा एकत्र हिंदु कूटूंबाच्या मिळकतींचे सरसनिरस मानाने वाटप होउन पृथक

कब्जा मिळण्यासाठी दाखल केला आहे. प्रतिवादी क्रमांक १ व २ यांनी निशाणी २८ वर कैफियत दाखल करून दावा मिळकत व्यतिरीक्त इतर मिळकतीही एकत्र कुटूंबाच्या आहेत परंतु त्या दाव्यात सामिल केलेल्या नाहीत अशी तक्रार मांडलेली आहे. तसेच प्रतिवादी यांनी प्रतिदावा दाखल करून प्रतिदाव्यातील मिळकती हया त्यांच्या स्वकष्टार्जित मिळकती असुन त्यास हरकत अडथळा करू नये अशी मागणी केली आहे. त्यामुळे अर्जातील नमुद मिळकती हया एकत्र हिंदु कुटूंबाच्या मिळकती आहेत अशी तक्रार प्रतिवादी यांनी पुर्वीच कैफियत दाखल करतांना मांडली होती असे दिसुन येते.

५. प्रतिवादी यांचे असे कथन आहे की एकत्र कुटूंबाच्या उत्पन्नाचा वापर करून वादी क्रमांक ४ याने स्वताची पत्नी व मुलाच्या नावाने अर्जात नमुद मिळकती हया विकत घेतल्या आहेत. याविरूध्द वादी यांचे असे कथन आहे की सदर मिळकती हया वादी क्रमांक ४ यांच्या स्वकष्टार्जित मिळकती आहेत. याकामी निश्चितच अर्जात नमुद मिळकती हया एकत्र कुटूंबाच्या मिळकती आहेत किंवा कसे हे शाबित करण्याची जबाबदारी प्रतिवादींवर आहे. त्यामुळे जर सदर मिळकती हया प्रतिदाव्यात सामिल केल्या गेल्या तर वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. याउलट वादी व प्रतिवादींमधील सर्व तक्रारी हया एकाच दाव्यात गुणदोषावर निकाली काढता येतील. त्यामुळे प्रस्तुतचा अर्ज हा मंजुर केल्यास वादी व प्रतिवादी यांच्यातील वाटणीबाबतचे सर्व वाद मुदयांचे निराकरण हे प्रस्तुतच्या दाव्यात करता येणे शक्य आहे.

६. याउपरही प्रस्तुतचा दावा हा अदयाप चौकशीकामी नेमण्यात आलेला नाही. प्रस्तुतचा दावा तात्पुरत्या मनाई हुकूमाच्या युक्तीवादासाठी प्रलंबित आहे. त्यामुळे प्रतिदाव्यातील नियोजित दुरूस्ती ही मंजुर केल्यास वादीचे कोणतेही नुकसान होणार नाही. म्हणुन वादी व प्रतिवादी यांचे वाद तसेच अर्जातील मिळकतीतील वादी व प्रतिवादी यांचा हक्क व अधिकार हे निश्चित करण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज हा मंजुर करणे हे न्यायाचे होईल करीता मी खालीलप्रमाणे ओदश पारीत करीत आहे.

## आदेश

१. प्रस्तुतचा अर्ज हा मंजुर करण्यात येतो.

२. प्रतिवादी यांनी १४ दिवसाचे आत दाव्यात दुरूस्ती करावी तसेच दुरूस्ती प्रत दाखल करावी.

दिनांकः २९.०८.२०१६

( प. घ. तापडिया )
सह दिवाणी न्यायाधीश क स्तर सटाणा